महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०४८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

आरोप करणाऱ्यांसोबतच मी सरकारमध्ये

अजित पवारांचा भाजपला थेट सवाल; ७० हजार कोटींच्या आरोपांवर पलटवार

पुणे : (समर्थ गांवकरी)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अजित पवारांनी सत्ताधारी भाजपवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत राजकीय वातावरण तापवले. माझ्यावर 70 हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते, हे सर्वांना माहिती आहे. पण ज्या लोकांनी माझ्यावर हे आरोप केले, त्यांच्याच सोबत मी आज सरकारमध्ये बसलो आहे, हे वास्तव आहे, असा थेट सवाल करत अजित पवारांनी भाजप नेत्यांना अडचणीत आणले. त्यांच्या या विधानामुळे पिंपरी-चिंचवडच्या निवडणूक प्रचारात नव्या वादाला तोंड फुटले आहे. अजित पवार म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांचे सध्या एकच लक्ष्य आहे. कुठे आणि कशातून भ्रष्टाचार करून पैसे कमावता येतील. आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिकांपैकी एक असलेली पिंपरी-चिंचवड पालिका कशी कर्जाच्या खाईत ढकलली गेली, हे जनतेने पाहिले आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यांच्या मते, पालिकेच्या सुमारे 8 हजार कोटी रुपयांच्या ठेवी भाजपच्या सत्ताकाळात मोडण्यात आल्या. या ठेवी मोडून नेमकी कोणती विकासकामे झाली, याचा हिशोब जनतेसमोर मांडावा, अशी थेट मागणी त्यांनी केली.

भ्रष्टाचाराचे पुरावे सादर करण्याची तयारी

आमच्या काळात शहरात सुसाट प्रवास होत होता, पण आज अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली रस्त्यांची वाट लावली आहे, असा टोला अजित पवारांनी लगावला. अनेक ठिकाणी अतिक्रमण वाढले असून तिथे हफ्तेखोरी सुरू असल्याचे चित्र दिसत असल्याचा आरोप त्यांनी केला. गेल्या नऊ वर्षांत भाजपच्या सत्ताकाळात झालेला हा विकास जनतेने पाहावा, असे सांगत त्यांनी टेंडरमध्ये रिंग आणि भ्रष्टाचाराचे पुरावे सादर करण्याची तयारी दर्शवली. पुराव्याशिवाय मी बोलत नाही, कोणावरही बिनबुडाचे आरोप करत नाही. ही राक्षसी भूक मला पाहवत नाही, अशा शब्दांत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. आता या आरोपांवर भाजपकडून काय प्रत्युत्तर येते, याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर बोलताना अजित पवार अधिक आक्रमक झाले. पिंपरी-चिंचवडमध्ये भ्रष्टाचार इतका वाढला आहे की अवघ्या सव्वा किलोमीटर रस्त्यासाठी 81 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, असा धक्कादायक दावा त्यांनी केला. आम्ही कधीही सत्तेचा उन्माद होऊ दिला नाही, पण सध्याच्या सत्ताधाऱ्यांना सत्तेची मस्ती, नशा आणि माज चढला आहे,

थोडक्यात...

भाजपचे दोन उमेदवार बिनविरोध विजयी

पुणे (समर्थ गांवकरी) : पुण्यात भारतीय जनता पक्षाने निवडणूकी आधीच खाते उघडले आहे. भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग 35 (ब) मधील उमेदवार मंजूषा नागपूरे आणि 35 (ड) मधील उमेदवार श्रीकांत जगताप हे बिनविरोध निवडून आलेले आहेत. नागपूरे यांच्यासह या प्रभागात सहा उमेदवारांचे अर्ज होते. त्यातील दोन अर्ज छाननीत बाद झाले होते. त्यानंतर चार अर्ज शिल्लक होते. त्यातील तीन उमेदवारांनी शुक्रवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी माघार घेतली. त्यामुळे नागपूरे यांची बिनविरोध निवड झाली असून त्या सलग तिसऱ्यांदा निवडून आलेल्या आहेत. या प्रभागात मागील दहा वर्षांपासून त्या सातत्याने कार्यरत असून नागपूरे यांचे पती दिपक नागपूरे हे भाजपचे सरचिटणीस आहे. या प्रभागात शहरात सर्वाधिक कमी अर्ज आले होते. तर, उर्वरीत उमेदवारांचे अर्ज माघारी घेण्यात भाजपला यश आले असल्याने नागपूरे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

मनोज जरांगे पाटलांनी घेतली भाजपच्या पूजा मोरे यांची बाजू

मुंबई (समर्थ गांवकरी) : महापालिका निवडणुकांचे वारे जोरात वाहू लागले असताना राजकीय लढाई आता थेट सोशल मीडियावर उतरल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. मात्र, या डिजिटल रणांगणात मुद्द्यांवर चर्चा होण्याऐवजी वैयक्तिक हल्ले, बदनामी आणि जुन्या व्हिडिओंच्या आधारे राजकारणाची पातळी घसरताना पाहायला मिळत आहे. पुण्यातील भाजप उमेदवार पूजा मोरे यांच्या जुन्या व्हिडिओंच्या माध्यमातून सुरु असलेल्या ट्रोलिंगमुळे वातावरण तापले असून, या प्रकारावर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. नाशिक दौऱ्यावर असताना त्यांनी या ट्रोलिंगविरोधात उघड भूमिका घेत, संबंधितांना गंभीर इशारा दिल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. निवडणुकीच्या काळात उमेदवारांच्या कामगिरी, धोरणे आणि जनतेसाठी असलेल्या भूमिकांवर चर्चा होणे अपेक्षित असते. मात्र, सध्याच्या घडीला सोशल मीडियावर जुने व्हिडिओ, पूर्वीची वक्तव्ये आणि वैयक्तिक आयुष्याशी संबंधित बाबी उकरुन काढून उमेदवारांना लक्ष्य करण्याचा प्रकार वाढताना दिसतो आहे. पूजा मोरे यांच्या बाबतीतही हाच प्रकार घडत असून, त्यांच्या जुन्या व्हिडिओंचा आधार घेत त्यांच्यावर टीका, टीपण्णी आणि ट्रोलिंगचा मारा केला जात आहे.

घायवळ टोळीचे दोन गुन्हेगार अटकेत; कोथरूड पोलिसांनी पकडले

पुणे : (समर्थ गांवकरी)

कोथरूड परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या निलेश घायवळ टोळीतील दोघांना कोथरूड पोलिसांनी बेड्या ठोकल्या. मोक्क्याच्या गुन्ह्यात ते फरार होते. पोलिसांकडून पेट्रोलिंग दरम्यान आरोपींना अटक करण्यात आली. मनीष रामकृष्ण माथवड (वय २८, रा. शोभा संकुल अपार्टमेंट, गणेश कॉलनी, कोथरूड) आणि चिक्या उर्फ ओंकार शाम फाटक (वय २६, रा. संत ज्ञानेश्वर कॉलनी, कोथरूड) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. दोघेही निलेश घायवळ टोळीचे सक्रिय सदस्य असून कोथरूड पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये मोक्का अंतर्गत पाहिजे होते. तपास पथकातील पोलीस अंमलदार विष्णू राठोड व आकाश वाल्मिकी यांच्याकडे आरोपी कोथरूड परिसरात येणार असल्याची खात्रीशीर माहिती होती. त्या आधारे पोलिस उपनिरीक्षक मोहन चव्हाण यांच्यासह पथकाने ३१ डिसेंबर रोजी पेट्रोलिंगदरम्यान सापळा रचून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. पोलिस उपायुक्त संभाजी कदम, सहायक पोलिस आयुक्त शीतल जानवे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक अनिल माने, अमंलदार मयूर पांढरे व प्रवीण मांडवकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय दोषी

पुणे : (समर्थ गांवकरी)

- हृदयनाथ, उषा मंगेशकरांसह 11 जणांवर फौजदारी खटला दाखल

एप्रिल २०२५ मध्ये गर्भवती तनिषा भिसेचा वेळेवर उपचार व रुग्णवाहिकेची सुविधा न दिल्याने मृत्यू झाला. या प्रकरणी धर्मादाय आयुक्तालयाने चौकशी अहवालात लता मंगेशकर मेडिकल फाउंडेशन संचलित दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरला दोषी ठरवले आहे. त्यानुसार प्रख्यात गायक, संगीतकार हृदयनाथ मंगेशकर, गायिका उषा मंगेशकर यांच्यासह ११ जणांवर फौजदारी खटला दाखल झाला आहे.

पुणे धर्मादाय आयुक्तालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच नामवंत रुग्णालयावर एवढी मोठी कारवाई झाली आहे. तनिषाला गंभीर स्थितीत मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेव्हा तेथील कर्मचारी, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपचारांसाठी १० लाख रुपये अनामत रक्कम मागितली, ती न दिल्याने उपचारांना उशीर झाला आणि तनिषा यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी संयुक्त धर्मादाय आयुक्त क्षीरसागर यांनी स्युमोटो चौकशी केली. यामध्ये उपधर्मादाय आयुक्त (पुणे) डॉ. राजेश परदेशी, रुग्णालय शाखेचे अधीक्षक दीपक खराडे तसेच निरीक्षक सचिन बकाळ व रवींद्र गावरे यांचा समावेश होता.

चौकशीनंतर पुणे धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे निरीक्षक सचिन बकाळ यांनी रुग्णालय व ११ विश्वस्तांविरोधात फौजदारी खटला दाखल केला आहे. यात पं. हृदयनाथ मंगेशकर, भारती मंगेशकर, उषा मंगेशकर, आदिनाथ मंगेशकर, डॉ. धनंजय केळकर, डॉ. जितेंद्र क्षीरसागर, ॲड. पी. एम. खिरे, सचिन व्यवहारे, आर. पी. जोशी आणि डॉ. प्रसाद राजहंस यांचा समावेश आहे.

अहवाल आमच्याकडे पोहोचलेला नाही

धर्मादाय आयुक्तालयाचा अहवाल आमच्यापर्यंत पोहोचलेला नाही. अहवालाशी संबंधित रुग्णाला डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली ठेवले होते, पण कोणतीही पूर्वसूचना न देता रुग्ण रुग्णालयातून बाहेर पडला. डॉक्टरांनी थांबविण्याचा प्रयत्न केला; मात्र ते थांबले नाहीत. - रुग्णालय प्रशासन, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय

पुण्यात शिवसेनेचे ११० उमेदवार रिंगणात

:नीलम गोऱ्हे यांची घोषणा, पत्रकार परिषदेत माहिती दिली

पुणे : (समर्थ गांवकरी)

पुणे मनपा निवडणुकीसाठी अर्ज माघारी घेण्याचा अंतिम दिवस होता. यानंतर शिवसेनेने पुण्यात ११० उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहेत. शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी शिवसेना नेते किरण साळी उपस्थित होते.

पक्षाच्या प्रचार मोहिमेचा प्रारंभ उद्या (३ जानेवारी) दुपारी साडेबारा वाजता हॉटेल सेंट्रल पार्क येथे मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत होणार आहे. तसेच, ९ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील प्रचारासाठी पुण्यात येणार आहेत.

शिवसेनेने एकूण १२३ उमेदवारी अर्ज भरले होते, त्यापैकी १३ अर्ज मागे घेण्यात आले. यामुळे ११० उमेदवार आता निवडणुकीस सामोरे जात आहेत. १४ ठिकाणी पक्षाचे पॅनल पूर्ण झाले असून, अनेक जण पुरस्कृत उमेदवारीसाठी विचारणा करत असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, राज्यात अनेक ठिकाणी महायुती झाली असली तरी, पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये युती होऊ शकली नाही. शेवटपर्यंत युतीचा प्रयत्न केला, पण ज्या जागांवर आमचा आग्रह होता, त्याबाबत भाजपकडून कोणताही निर्णय झाला नाही.

आम्ही भाजपकडे २५ जागांची सन्मानजनक मागणी केली होती, जी अवास्तव नव्हती, पण आमचे समाधान झाले नाही. आमचे नगरसेवक स्वतःच्या पक्षात घेऊन त्या जागा स्वतःच्या सांगणे

कोणत्या तत्त्वात बसत नाही. युती बिघडण्यामागे पडद्यामागे काय घडले, हे सांगता येत नाही. जो पक्ष स्वतःला 'मोठा भाऊ' समजतो, त्यांना मोठी भूमिका घ्यावी लागते, असेही त्यांनी नमूद केले.

युती झाली किंवा नाही, यावर निवडणुकीतील यश अवलंबून नाही. आम्ही आमच्या पक्षाचा अजेंडा घेऊन मतदारांपर्यंत पोहोचत आहोत. पुण्याच्या तत्कालीन महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यकाळात शहरातील प्रश्न का सुटले नाहीत, याबाबत त्यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी डॉ. गोऱ्हे यांनी केली. लोकसभा, विधानसभा आणि नगरपरिषद निवडणुकांमध्ये शिवसेनेला चांगले यश मिळाले आहे.

अनेक पक्षांनी गुंडांना उमेदवारी दिली आहे, पण मतदारांनी सजगपणे निर्णय घ्यावा आणि कोण मतदार हिताचे काम करत आहे, हे लोकांनी पाहिले पाहिजे. लोकप्रतिनिधींनी जबाबदारीने वागले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

पुण्याचा कौल सांगायला आता ज्योतिषाची गरज नाही!

पुणे : (समर्थ गांवकरी)

पुणे मनपा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे (भाजप) दोन अधिकृत उमेदवार श्रीकांत जगताप आणि मंजुषा नागपुरे बिनविरोध निवडून आले आहेत. या निकालानंतर पुण्याचा कौल काय असेल हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज लागणार नाही, असे भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी म्हटले आहे. संबंधित प्रभागात विरोधकांनी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे हे दोन नगरसेवक बिनविरोध निवडून आले. प्रभाग क्रमांक ३५, सनसिटी माणिकबाग परिसरातून मंजुषा नागपुरे आणि श्रीकांत जगताप यांनी ही निवडणूक जिंकली. त्यांच्या या विजयामुळे पुणेकरांच्या मनात आनंद आणि उत्साह द्विगुणित झाल्याचे घाटे यांनी सांगितले. या बिनविरोध विजयी उमेदवारांचा सत्कार भाजप शहर कार्यालयात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार भीमराव तापकीर आणि शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी दीपक नागपुरे, रवींद्र साळेगावकर, विकास दांगट, अमोल कविटकर उपस्थित होते. पुणे भाजपच्या निवडणूक प्रचाराचा प्रारंभ ३ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता समता भूमी येथे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार आहे.

- बिनविरोध विजयानंतर धीरज घाटे यांचा विरोधकांना टोला

बिघडलेले गाव सुधारण्यासाठी पाटील अन् कुलकर्ण्यांना युती करावीच लागते

अ. भा. मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांचे विधान

सातारा : (समर्थ गांवकरी)

बिघडलेले गाव सुधारण्यासाठी पाटील आणि कुलकर्ण्यांना युती करावीच लागते, असे विधान ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, पानिपतकार विश्वास पाटील यांनी केले. संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात त्यांनी केलेल्या या वक्तव्यावरून सामाजिक, राजकीय तसेच साहित्यिक वर्तुळात नवा वाद सुरू होण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, महाराष्ट्रात फक्त मराठी भाषेचीच सक्ती राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

पाटील म्हणाले की, साहित्य संमेलन म्हणजे फक्त एक कार्यक्रम नसतो, तर तो देशाला आचार, विचार व दिशा देण्याचा कार्यक्रम असतो. सातारच्या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी आपण एका पाटलाला बोलावले आहे. पाटील हे आडनाव घेतले की कुस्तीचा, तमाशाचा व उसाचा फड डोळ्यासमोर उभा राहतो. पण तुमच्यासमोर बोलणारा हा पाटील फक्त शब्दांच्या फडामध्ये रमणारा आहे. ९९ व्या साहित्य संमेलनाचा अध्यक्ष एका पाटलाला करा अशी मागणी जोशी व कुलकर्णींनी केली. तुम्हाला माहिती आहे की, बिघडलेले गाव सुधारायचे असेल तर पाटील व कुलकर्ण्यांना युती करावीच लागते. ही आपली जुनी वहिवाट आहे, असे ते म्हणाले.

पाटील असेही म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी संमेलनाचे अध्यक्ष असताना 'लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या' असे आवाहन केले होते. त्यापुढे जाऊन त्यांनी मातृभाषेतच शिक्षण दिले पाहिजे, असे सांगत मायमराठीचा पुरस्कार केला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठेंना भारतरत्न पुरस्कार मिळाला पाहिजे अशीही मागणी पाटील यांनी केली.

मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्रात फक्त आणि फक्त मराठीच सक्तीची आहे. मराठीशिवाय अन्य कुठल्याही भाषेची सक्ती नाही. त्रिभाषा सूत्रानुसार आणखी कोणती भाषा समाविष्ट करावी यावर विचार सुरू आहे. कोणत्या वर्गापासून भाषा शिकवायची यासाठी डॉ. नरेंद्र जाधवांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल अंतिम टप्प्यात आला आहे.

याआधीही विश्वास पाटील यांचे वादग्रस्त विधान

एका यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत पाटील म्हणाले होते की, त्यांच्या आजोबा आणि पणजोबांची नोंद 'मराठा कुणबी' म्हणून होती, पण त्यांना दाखला मिळाला नाही. ज्यांना दाखले मिळाले अशा कमी बुद्धीच्या लोकांच्या हाताखाली मला जीवनभर काम करावे लागले. ते केवळ दाखला मिळाला म्हणून साहेब झाले.

शिक्षण तज्ज्ञांशी साधला सुसंवाद

संगमनेर : (समर्थ गांवकरी)

ना.दादाजी भुसे, शालेय शिक्षण मंत्री यांनी राज्यातील शिक्षण तज्ज्ञांनी संवाद साधला. विविध शिक्षण विषयक प्रश्नांवर राज्यातील शिक्षण तज्ज्ञांची भूमिका जाणून घेतली....

महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि काळानुरूप व्हावी यासाठी राज्यातील शिक्षण अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ यांचेशी माननीय शिक्षणमंत्री नामदार दादाजी भुसे यांनी अनौपचारिक गप्पांद्वारे सुसंवाद साधला. या गप्पांचा विषय होता – शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा.

या चर्चेत प्रसिद्ध दिग्दर्शक-अभिनेते मंगेश देसाई, शिक्षण अभ्यासक हेरंब कुलकर्णी, संदीप वाकचौरे,प्रतिभा भराडे, प्रवीण काळम पाटील, शिक्षण विकास मंचचे समन्वयक माधव सूर्यवंशी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. गीता शिंदे तसेच प्रा. डॉ. राजेश बनकर आदी मान्यवर सहभागी झाले होते. खासदार संदीपनजी भुमरे ही यावेळी उपस्थित होते.... त्यांनीही मौलिक सूचना मांडत शैक्षणिक पायाभूत सुविधा आणि ग्रामीण शाळांच्या समस्या यावर भर देण्याची गरज अधोरेखित केली.

बैठकीदरम्यान शिक्षक-विद्यार्थी संबंध, अध्यापनातील सर्जनशीलता, नाट्यकलेद्वारे शिक्षण प्रभावी करण्याचे मार्ग, भाषाशिक्षण, मातृभाषेचे महत्त्व, डिजिटल साधनांचा वापर, तसेच ग्रामीण-शहरी शैक्षणिक दरी कमी करण्याच्या उपाययोजना यावर सखोल चर्चा झाली.

तज्ज्ञांनी शिक्षणातील नवनवीन प्रयोग आणि जागतिक दर्जाचे मानदंड गाठण्यासाठी धोरणात्मक बदलांची गरज व्यक्त केली.

शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी सर्व मान्यवरांची भूमिका समजून घेतली आणि पुढील काळात अशा चर्चांचा विस्तार करून त्यातून आलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचा मनोदय व्यक्त केला .

"महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण , दर्जेदार आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे यासाठी समाजातील विविध घटकांचा सहभाग महत्त्वाचा आहे," असे ते म्हणाले.

यावेळी शिक्षणमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी हेल्थ कार्ड विकसित केले जाणार आहे. तसेच "आनंददायी शनिवार" या संकल्पनेअंतर्गत राष्ट्रभक्तीपर संगीतमय कवायत, क्रीडा व सैनिकी शिक्षण , याशिवाय शिक्षकांसाठी कला-कीडा स्पर्धा या विषयांवर प्रकाश टाकला.

अध्ययन अध्यापनासोबतच सांस्कृतिक व कलात्मक सहभाग वाढविण्याची गरज व्यक्त केली. बैठकीतून शिक्षक प्रशिक्षण, अभ्यासक्रम समृद्धी, सांस्कृतिक दृष्टिकोनातून शिक्षणाची उन्नती आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे यासंदर्भात सूचना पुढे आल्याने आगामी काळात ठोस निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होईल,आणि पुढील वर्षी राज्यातील शैक्षणिक गुणवत्तेचे चित्र पूर्वीपेक्षाही उत्तम असेल, असा आशावाद व्यक्त केला.

एन एस एस मुळे समाजाशी नाते अधिक दृढ होते

- डॉ. विजय जाधव
- बी. एन. एन. महाविद्यालयाचा एनएसएस श्रमदान कॅम्प विक्रमगड येथे रवाना

भिवंडी : (समर्थ गांवकरी)

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचलित बी. एन. एन. महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत आयोजित श्रमदान कॅम्प आज सकाळी पालघर जिल्ह्यातील उल्हासराव भोईर आश्रम शाळा, विक्रमगड येथे उत्साहात रवाना झाला. या कॅम्पचे उद्घाटन संस्थाध्यक्ष डॉ. विजय जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ .विजय जाधव यांनी ग्रामीण जीवनातील महत्त्व सांगत कॅम्प मधील सर्व सहभागी स्वयंसेवकांना शुभेच्छा दिल्या. एनएसएसमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि समाजाशी नाते अधिक दृढ होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी प्र. प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर, एनएसएस कार्यक्रम अधिकारी, डॉ. आर एल रूपवते, डॉ. गुलिस्ता अन्सारी, प्रा. इफ्रा मोमीन, प्रा. अक्षय भोईर, प्रा. अजित भोईर यांची उपस्थिती होती. कॅम्प रवाना होताना प्र. प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रबंधक नरेश शिरसाळे उपस्थित होते. या सात दिवसीय एनएसएस कॅम्पमध्ये महाविद्यालयातील एकूण 120 स्वयंसेवक विद्यार्थी सहभाग घेत असून, ग्रामविकास, स्वच्छता अभियान, सामाजिक प्रबोधन, पर्यावरण संवर्धन तसेच विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. बी के पाईकराव, डॉ. सोनम मोरे, शिक्षकेतर कर्मयोगी यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. बी. एन. एन. महाविद्यालयाचा हा उपक्रम समाजोपयोगी कार्यात विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांना पुरस्कार

- ग्रामीण शिक्षणाच्या उज्वल भविष्यासाठी झटणाऱ्या नेतृत्वाचा गौरव

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाला नवी दिशा देणारे, विद्यार्थीकेंद्री शिक्षणव्यवस्था उभारणारे आणि प्रशासन, अध्यापन व सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर समन्वय साधणारे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथील प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय गंगाजी बाबाजी आदर्श प्राचार्य पुरस्कार जाहीर झाला. हा मानाचा पुरस्कार माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते दि. १ जानेवारी २०२६ रोजी एका भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार म्हणजे केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, ग्रामीण शिक्षणाच्या पुनरुज्जीवनाची दखल असल्याचे मत त्यावेळेस उपस्थित व्यक्तींनी मांडले डॉ. सूर्यवंशी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाने NAAC चे A+ मानांकन प्राप्त केले. ग्रामीण भागातील महाविद्यालयासाठी हे मानांकन मिळवणे ही अत्यंत कठीण व आव्हानात्मक बाब असते. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, पायाभूत सुविधा, विद्यार्थी विकास, प्रशासनातील पारदर्शकता व समाजाभिमुख उपक्रम या सर्व घटकांमध्ये महाविद्यालयाने केलेली भरीव प्रगती या मानांकनामागे आहे. यासाठी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांचे धोरणात्मक पाठबळ, संचालक मंडळाची सकारात्मक भूमिका आणि प्राचार्यांचे सक्षम नेतृत्व यांचा सुंदर मेळ घडून आला. महाराष्ट्रातील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्राचार्य म्हणून काम करण्याच्या संधी उपलब्ध असतानाही, "ज्या महाविद्यालयात मी घडलो, ज्या मातीतून मला ओळख मिळाली, त्याच महाविद्यालयाच्या विकासासाठी आयुष्य देणे अधिक महत्त्वाचे आहे"

डॉ. हेमंत धुमाळ यांची नियुक्ती

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंद्याचे भूमिपुत्र डॉ. हेमंत धुमाळ यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. जलसंपदा क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि उत्कृष्ट प्रशासकीय कार्याची पावती म्हणून राज्य शासनाने त्यांच्या पदोन्नतीवर शिक्कामोर्तब केले. त्यांच्या नियुक्तीने श्रीगोंदा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील अधिकाऱ्याने राज्याच्या जलसंपदा विभागातील सर्वोच्च पदांपैकी एक असलेल्या 'कार्यकारी संचालक' पदापर्यंत मजल मारल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे कृष्णा खोऱ्यातील सिंचन प्रश्नांना तांत्रिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही स्तरांवर न्याय मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

पोदार प्रेप संगमनेर येथे 'विंटर वंडरलँड' उत्साहात साजरा

संगमनेर : (समर्थ गांवकरी)

पोदार प्रेप संगमनेर येथे नुकताच 'विंटर वंडरलँड' हा अतिशय देखणा आणि उत्साहपूर्ण सोहळा पार पडला. पोदार प्रेपच्या संचालिका डॉ. स्वाती वत्स यांच्या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात चिमुकल्यांनी व पालकवर्गाने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत ख्रिसमस सणाचा आनंद लुटला.

हिवाळ्यातील निसर्गाचे सौंदर्य आणि ख्रिसमसचा आनंद चिमुकल्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी या खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी संपूर्ण शाळा पांढऱ्या आणि लाल रंगाच्या सजावटीने सजवण्यात आली होती. विद्यार्थी व पालकांचे स्वागत पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सौ. सोनल शुक्ला यांनी केले व कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद घेण्याचे आवाहन केले. शाळेत प्रवेश करताच विद्यार्थ्यांचे स्वागत 'स्नोमॅन', 'ख्रिसमस ट्री' आणि सांताक्लॉज ने करण्यात आले.

केलेल्या सजावटीला मोबाईल मधे कैद करत फोटोसेशन ला जणु उधाण आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी हिवाळ्यातील विविध उबदार कपडे व उन्हाळ्यातले पोषाख यांना ओळखणारी ॲक्टिव्हिटी केली. तसेच इतरही काही ज्ञानवर्धक व मनोरंजक ॲक्टिव्हिटी चे आयोजन स्कुलतर्फे करण्यात आले होते. 'जिंगल बेल्स' या गाण्यावर काही चिमुकल्यांनीही ठेका धरत पालकांचा आनंद द्विगुणित केला. काही विद्यार्थी सांताक्लॉज बनुन आले होते तर काही विविधरंगी पोषाख परिधान करून आले होते. स्कुलतर्फे आयोजित केलेले विविध 'विंटर' थीमवरील गेम्सचा विद्यार्थी व पालकांनी मनमुराद आनंद लुटला . या उपक्रमामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला आणि त्यांना निसर्गातील ऋतूचक्राची माहिती खेळीमेळीच्या वातावरणात मिळाली, अशी भावना पालकांनी व्यक्त केली व लिखित अभिप्राय नोंदवत समारंभातुन निरोप घेतला. पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या सौ. मिनाक्षी मिश्रा यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. शाळेचे प्रशासकीय अधिकारी श्री सागर नेरपगार, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहयोगाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

ढवळगाव येथे शौर्य दिनानिमित्त अन्नदान

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

भिमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ इतिहासाचा स्मरणदिन नसून, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची शिकवण देणारा दिवस आहे. ढवळगाव येथे एरंडोली येथील माता रमाई माता भिमाई महिला बचत गटातर्फे भिमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त तालुक्यातून येणाऱ्या भिम अनुयांना शौर्य दिनाला मानवंदना देण्यासाठी जाणाऱ्या भाविकांना चहा नाष्ट्याची सुविधा ढवळगाव येथे उपलब्ध करून देण्यात आली होती . महिला बचत गटांनी उचललेले अन्नदानाचे पाऊल हे शौर्याला केवळ शब्दांत नव्हे, तर सेवेतून दिलेले सच्चे अभिवादन ठरले. भिम अनुयायांच्या वाटचालीत दिलेला हा उल्पोहार म्हणजे समतेचा, बंधुत्वाचा आणि प्रेरणेचा संदेश आहे. अशीच सामाजिक जाणीव व सेवा भावना समाजात रुजत राहिली, तर परिवर्तनाचा मार्ग अधिक सशक्त होईल. यावेळी भिमा कोरेगाव येथे मानवंदना देण्यासाठी तालुक्यातून मोठ्या प्रमाणात भिम अनुयायी जात असतात . भिम अनुयांनी बचत गटांचे कौतुक केले . श्रीगोंदा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पंकज गणवीर यांचे वतीने दोन्ही बचतगटांच्या अध्यक्षांचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. माता रमाई बचत गटाच्याअध्यक्ष मिना राजू शिंदे माता भिमाई बचतगटाच्या अध्यक्ष मंदा संतोष शिंदे यांचा लता संजय औचिते यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला . कार्यक्रम यशस्वितेसाठी मिना नितिन शिंदे . गौरी शिंदे, दिपाली शेंडगे मनिषा थोरात ,लता संजय औचिते पोपट शिंदे राजेंद्र शिंदे . बापू बोरगे विठल शिंदे भाऊसाहेब शिंदे सुनिल शिंदे जवाहर पठारे यांनी विशेष परिश्रम घेतले . ' यावेळी वंचितचे तालुकाध्यक्ष संतोष जौंजाळ , श्रीगोंदा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष पंकज गणवीर सुनिल शिंदे , राहुल बोरगे , बाळासाहेब पठारे , सोन्याबापू बोरगे , परिसरातील बहुसंख्य नागरिक तसेच भिम अनुयायी उपस्थित होते.

बिबट्याने पाडला मेंढ्यांचा फडशा

तामसा : (समर्थ गांवकरी)

हादगाव तालुक्यातील चिकाळा शिवारात बिबट्याने दोन मेंढ्यांचा फडशा पडून एका मेंढिला गंभीर जखमी केल्याची घटना गुरुवारी (ता. १) पहाटे उघडकीला आली. या घटनेमुळे शेतकरी व ग्रामस्थांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. येथील शकुंतला बाई गायकवाड यांचे घर गाव परिसरातील डोंगराला लागून आहे. गायकवाड कुटुंब मेंढी व शेळ्या पालन करतात. बिबट्याने घरासमोर बांधलेल्या मेंढ्यांवर हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यानंतर गायकवाड कुटुंबाने आरडाओरड केली. या घटनेनंतर तामसा वन परिमंडळ अधिकारी प्रिया साळवे, वनरक्षक वैशाली मुसळे, पोलीस पाटील दत्ता चंदनवार यांनी जायमोक्यावर पाहणी केली. बिबट्याच्या हल्ल्यामुळे शकुंतलाबाई यांचे अंदाजे साठ हजार रुपयांची नुकसान झाले आहे.

मेहनत, निष्ठा आणि सेवाभावातूनच खरा विकास

अनुराधाताई नागवडे

श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)

मेहनत, निष्ठा आणि सेवाभाव या त्रिसूत्रीवरच खरा व शाश्वत विकास उभा राहतो, असे प्रतिपादन दि. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका अनुराधाताई राजेंद्रदादा नागवडे यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने उक्कडगाव येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. हा समारोप कार्यक्रम बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडला. शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडीक जमीन व्यवस्थापन या संकल्पनेवर आधारित हे शिबिर दि. २१ ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. घरापासून दूर राहून स्वतःची कामे स्वतः करणे, नियोजनबद्ध दिनचर्या पाळणे व ग्रामस्थांचे जीवन जवळून पाहण्याची संधी स्वयंसेवकांना मिळाली. शिबिरादरम्यान घासावा शब्द तासावा शब्द, पाणी-वाणी-नाणी नासू नये, युवकांनो जागे व्हा, पर्यावरण संवर्धन, व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्यधन संपदा आदी विषयांवर विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. ग्रामस्थांमध्ये सचिन कातोरे , शंकर गोलांडे यांनी मनोगत व्यक्त केले . अध्यक्षीय भाषणात अनुराधाताई नागवडे म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, शिस्त, नेतृत्वगुण व सामाजिक बांधिलकी निर्माण होते. समाजाच्या सर्वांगीण विकासात युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या कालावधीत एनएसएस स्वयंसेवकांनी श्रमदान, स्वच्छता मोहीम, पाणलोट क्षेत्र जनजागृती, पडीक जमीन व्यवस्थापन, वृक्षलागवड, प्रभातफेरी, व्याख्यानमाला व सामाजिक प्रबोधनात्मक उपक्रम यशस्वीरीत्या राबविले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संरक्षण व सामाजिक ऐक्याबाबत सकारात्मक जागृती निर्माण झाल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य सतीशचंद्र सूर्यवंशी व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांनी स्वयंसेवकांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्राचार्य चंद्रभान कातोरे तसेच उक्कडगावच्या ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

विद्यार्थिनींचा मोबाईल वापर बंदीचा संकल्प

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात नववर्षाचे औचित्य साधून विद्यार्थिनींनी मोबाईल वापर न करण्याचा सामूहिक संकल्प केला. इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी कु. पूर्वा युवराज रणसिंग हिच्या पुढाकाराने शाळेतील सर्व विद्यार्थिनींनी मोबाईलच्या अति वापरास आळा घालण्याची प्रतिज्ञा केली. या उपक्रमातून विद्यार्थिनींनी मोबाईलच्या अति वापरामुळे होणारे शैक्षणिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम लक्षात घेत अभ्यास, आरोग्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी मोबाईलपासून दूर राहण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे यांनी मोबाईलच्या मर्यादित व योग्य वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अभ्यासातील एकाग्रता, वाचनाची सवय आणि प्रत्यक्ष संवादाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितले.

विखे-जगताप एक्स्प्रेस सुसाट; पाच नगरसेवक बिनविरोध

अहिल्यानगरमध्ये महायुतीचा निवडणूकीआधीच गुलाल, सत्ता एकहाती येण्याचे संकेत

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर महापालिका निवडणुकीआधीच राजकीय वातावरण तापले असून भारतीय जनता पक्षाने आघाडी घेतल्याचे चित्र आहे. नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांची परंपरा कायम ठेवत भाजपने महापालिकेतही विजयाचा गुलाल उधळण्यास सुरुवात केली आहे. निवडणूक प्रक्रियेच्या सुरुवातीलाच महायुतीचे पाच उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने शहराच्या राजकारणात मोठी चर्चा रंगली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री विखे पाटील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप

राष्ट्रवादी महायुतीने शहराच्या राजकारणात ठोस पकड निर्माण केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

प्रभाग क्रमांक सातमधून पुष्पां अनिल बोरुडे, तर प्रभाग क्रमांक सहामधून करण कराळे आणि सोनाबाई शिंदे हे भाजपचे तीन उमेदवार कोणताही सामना न होता विजयी ठरले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)नेही निवडणुकीत खाते उघडले आहे. प्रभाग क्रमांक 8 मधून कुमार वाकळे आणि प्रभाग क्रमांक 14 मधून प्रकाश भागानगरे हे उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत.

एकूणच, निवडणूकपूर्व टप्प्यातच बिनविरोध विजयानं अहिल्यानगरच्या राजकारणात सत्ता एकहाती जाण्याचे संकेत मिळत आहेत. पालकमंत्री तसेच मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या रणनितीमुळे भाजपचा आत्मविश्वास अधिक बळावला आहे.

या निवडणुकीत तब्बल पाच नगरसेवक बिनविरोध निवडून येणे ही घटना राजकीय वर्तुळात 'भूतो न भविषयती' अशी मानली जात आहे. निवडणूकपूर्व टप्प्यातच एवढ्या मोठ्या प्रमाणावर बिनविरोध यश मिळाल्याने महायुतीच्या संघटनात्मक ताकदीचा अंदाज आला आहे.

अहिल्यानगरच्या विकासाचा विश्वासार्ह चेहरा

अहिल्यानगर शहराचा विकास सुजय विखे पाटील आणि संग्राम जगताप हेच प्रभावीपणे करू शकतात, हे या निवडणूक प्रक्रियेतून पुन्हा एकदा सिद्ध झाल्याची भावना राजकीय व सामाजिक स्तरावर व्यक्त होत आहे. एकूणच, बिनविरोध निवडी आणि निर्माण झालेली सहानुभूती यामुळे महायुतीचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

येत्या पंधरा तारखेला जाहीर होणारा निकाल भाजप राष्ट्रवादी महायुतीचाच असेल, असा ठाम विश्वास कार्यकर्त्यांपासून नेत्यांपर्यंत व्यक्त केला जात आहे. बिनविरोध विजयामुळे महायुतीचे पारडे आधीच जड झाल्याचे चित्र आहे.

खासदारकीच्या निवडणुकीत पराभव झाला असला, तरी डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यानंतरही शहरासाठी सातत्याने काम सुरू ठेवले. विकासकामांकडे लक्ष देणे, विविध योजनांसाठी निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणे आणि नागरिकांशी थेट संपर्क ठेवणे या भूमिकेमुळे त्यांच्याविषयी शहरात सहानुभूती निर्माण झाली आहे. खासदार असताना राबवलेल्या विकासकामांचा ठसा आणि त्यानंतरही कायम राहिलेली सक्रियता याच जोरावर पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याचे बोलले जात आहे. यामुळे नेतृत्वावरचा जनतेचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे दिसते.

जिल्ह्यातील गुन्हेगारीचा पूर्णपणे बीमोड करा

- पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील
- जिल्हा पोलीस दलाच्या ताफ्यात २८ नवीन वाहने दाखल

शिर्डी : (समर्थ गांवकरी)

"जिल्ह्याची प्रतिमा मलिन करणाऱ्या आर्थिक घोटाळ्यांतील मुख्य आरोपींपर्यंत पोहोचण्यासाठी व वाढलेला अमली पदार्थांचा विळखा तोडण्यासाठी पोलिसांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता कठोर कारवाई करावी. गुन्हेगारीचा पूर्णपणे बीमोड झाला पाहिजे," असे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

शिर्डी येथे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जिल्हा पोलीस दलास प्रदान करण्यात आलेल्या २८ चारचाकी वाहनांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, "बदलत्या काळानुसार गुन्हेगारीचे स्वरूप बदलले असून, गुन्हेगार अद्ययावत शस्त्रांचा व इंटरनेटसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी पोलीस दलाचे आधुनिकीकरण ही काळाची गरज आहे. जिल्ह्यातील विविध आर्थिक घोटाळ्यांमुळे जिल्ह्याची प्रतिमा मलिन होत आहे. अशा गुन्ह्यांतील मुख्य आरोपींपर्यंत पोहोचण्यासाठी पोलीस यंत्रणेने विशेष प्रयत्न करावेत. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता किंवा उपोषणासारख्या बाबींना न घाबरता, सामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या आर्थिक गुन्हेगारांवर तात्काळ व कठोर कारवाई झालीच पाहिजे."

ते पुढे म्हणाले, "श्रीरामपूर येथील गोळीबार, विशेषतः देशविघातक कृत्य करणाऱ्या आरोपींच्या समर्थनात जमणारा जमाव, या बाबी समाजासाठी अत्यंत चिंताजनक आहेत. गुटखा व अवैध व्यवसायातून येणारा पैसा गुन्हेगारीला बळ देत असून, जिल्ह्यात वाढलेला अमली पदार्थांचा विळखा व बेकायदेशीर शस्त्रांचा वावर रोखणे अत्यंत गरजेचे आहे. जिल्ह्याला गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी तसेच जनतेच्या सुरक्षिततेसाठी आधुनिक यंत्रणा व साधनांची गरज असल्यास, जिल्हा नियोजन निधीच्या माध्यमातून ती तत्काळ उपलब्ध करून दिली जातील."

"शासनाचा भर केवळ वाहने देण्यावर नसून पोलिसांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी निवासस्थानांचा प्रश्न सोडविण्यावरही आहे. अहिल्यानगर शहरात ३२२ कोटी रुपये खर्चाच्या पोलीस निवासस्थान संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच, सायबर गुन्हे व गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी सर्व तालुक्यांच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यासाठी निधी देण्याचा निर्णय घेतला असून, उपविभागीय स्तरावरही अत्याधुनिक 'कमांड सेंटर' उभारणे आवश्यक आहे. समृद्धी महामार्ग व इतर राष्ट्रीय महामार्गांवर अपघात झाल्यास मदतीसाठी या नवीन वाहनांचा मोठा उपयोग होईल," असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : आ. कोहलीकर

तामसा : (समर्थ गांवकरी)

ग्रामीण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी शाळेत निधी कमी पडू देणार नाही. खरटवाडी ता. हदगांव येथे जिल्हा परिषद शाळेत दोन वर्ग खोलीचं लोकार्पण,व मंगल कार्यालय,दोन अंगणवाडी खोली, पांदन रस्ते, महादेव मंदिर सुशोभीकरण असं एकूण १कोटी ३२लाख रुपये निधी चे भूमिपूजन आमदार बाबुराव कदम कोहलीकर यांच्या हस्ते करण्यात आलं या कार्यक्रमात कोहलीकर यांनी शाळेच्या मूलभूत सुविधा साठी निधी कमी पडुदेणार नाही.शाळेत प्रयोगशाळा, किचन रूम, अतिरिक्त रूम, क्रीडा साहित्य वर्ग वाढी साठी शाळेच्या मुख्याध्यापक चंद्रकांत कुणके यांनी निवेदन दिलं. या कार्यक्रमात तामसा चे माजी सरपंच माधव नारेवाड,नगरसेवक गोपाल सारडा, प्रताप सोळंके, सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक चांगून बॉईनवाड, राष्ट्रवादी काँग्रेस चे तालुका अध्यक्ष निलू पाटील कल्याणकर, शंकर जगदाळे, हरदास चिंतले, पोलीस पाटील बालाजी कडबे, शिरू पाटील, भगवान पवार, शरद दुगाळे,उमेश पुंजरवाड,गोकुळ पांडे, सरपंच रुक्मिणी पुंजरवाड,शालेय व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष मनोहर पुंजारवाड, भुजंग पुंजरवाड सह गावकरी उपस्थित होते..

बारसगाव शिवारात बिबट्याचा बैलांवर हल्ला

- शेतकरी वर्ग भयभीत बिबटा जोमात वनविभाग कोमात

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील बारसगाव येथील शेतकऱ्यांच्या बैलावर बिबट्याने हल्ला करून मारण्याचा प्रयत्न दि.१ गुरुवारी रोजी दुपारी केला आहे. शेतकऱ्याच्या सावध भूमिकेमुळे बैलाचे प्राण वाचले आहेत.

बारसगाव शिवारातील शेतकरी सदाशिव मठपती यांचा बैल जनावरे धुर्यावर बांधले होता अचानकपणे बिबट्याने हल्ला करून बैलाच मारण्याचा प्रयत्न केला. बिबट्या बैलावर हल्ला करून खाली पडले होते.

अचानकपणे दोन सालगडी येथे आले त्यांना बिबट्या बैलावर हल्ला करीत असल्याचे लक्षात आले त्यांनी दुसऱ्या दोन सोप्यांना बोलावून चौघजणांनी बिबट्यावर दगडाने प्रतिकार केल्यामुळे बैलासह बाजूला असलेल्या जनावरांच्या जिव वाचला तर बिबट्याने धूम ठोकत पळ काढला आहे.

अचानकपणे बिबट्याचे हल्ले वाढल्यामुळे शेतकरी वर्गानी शेतीतील कामे कसे करावे या चिंतेत असून वन विभागाने बिबट्याला त्वरित जेरबंद करावे अशी मागणी जनतेतून होत आहे. दोन दिवसापूर्वीच बिबट्या निवघा शिवारात आढळला होता. बिबट्याचे व्हिडिओ सुद्धा समाज माध्यमावर व्हायरल झाले होते. वन विभागाने बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पावली उचलावीत तसेच शेतकरी वर्गात बिबट्याच्या वावरामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली की बिबट्या जोमात वन विभाग कोमात अशी चर्चा गावागावात होत आहे. हल्ला केलेल्या बैलावर पशुसंवर्धन विभागाच्या डॉक्टरांनी उपचार केले आहे.

खो-खो स्पर्धेमध्ये दैदीप्यमान यश

बेल्हे : (समर्थ गांवकरी)

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित,समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी,बेल्हे व इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन (आयपीए),आळेफाटा लोकल ब्रांच यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे, मुंबई राज्यस्तरीय मुलांच्या खो-खो स्पर्धेचे आयोजन समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये आयपीए आळेफाटा स्थानिक शाखा अंतर्गत विविध महाविद्यालयातील संघ सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. समर्थ शैक्षणिक संकुलाचे कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.स्पर्धेचे विजेतेपद समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी बेल्हे व उपविजेतेपद समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी यांना मिळाले.तसेच मुलींच्या खो-खो स्पर्धा जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसी, कुरण येथे पार पडल्या.

जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पत्रकार शेख आयेशा यांचा वाढदिवस साजरा

- सामाजिक कार्याचा वसा घेतलेल्या पत्रकारितेतील सावित्री म्हणजेच शेख आयेशा मॅडम होय - फौजदार वासुदेव मिसाळ

बीड : (समर्थ गांवकरी)

पत्रकारिताक्षेत्रामध्ये खऱ्या अर्थाने सामाजिक कार्याचा खडतर वसा पत्रकार शेख आयशा मॅडम यांनी घेतला आहे. सातत्याने उपेक्षित, वंचित आणि तृतीयपंथीयांसाठी त्यांचे सुरू असलेले सामाजिक कार्य आदर्शवत असून त्यांनी आपला स्वतःचा वाढदिवस जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात साजरा करून इतरांसमोर एक चांगला आदर्श निर्माण केला आहे असे प्रतिपादन शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे फौजदार वासुदेव मिसाळ यांनी केले. बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथे लोकजगतच्या संपादक शेख आयेशा रफिक यांचा वाढदिवस केंद्रातील बेघर लाभार्थ्यांना गोड जेवण देऊन सामाजिक उपक्रमांनी 1 जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संपादक तथा पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह पत्रकार शेख आयुब,जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश गंगाधरे, ज्येष्ठ संपादिका प्रतिभा गणोरकर, नयना भाकरे, डॉ. संजय तांदळे, शेतकरी संघटनेचे करपे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार गौतम भालेराव, अफसाना शेख तसेच जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे,काळजीवाहक छाया सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सर्व मान्यवरांनी पत्रकार शेख आयेशा रफिक यांना वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करून आपला वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा केल्याबद्दल कौतुक केले. या कार्यक्रमास जिल्हाभरातून पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्यांना स्वतःच्या हक्काचे छत नाही, रक्ताचे नातेवाईक सांभाळत नाहीत अशा बेघर निराधारांना सांभाळण्याचे त्यांना स्वाभिमानाने जगवण्याचे अवघड काम जिव्हाळा बेघर निवारा केंद्र हे कोणत्याही शासनाच्या अनुदानाशिवाय दानशूर यांच्या मदतीने करत आहेत. हे काम अतिशय अवघड असल्यामुळे त्यांच्या या कार्याला मदत म्हणून बीड शहरासह जिल्ह्यातील पत्रकारांनी आपला स्वतःचा वाढदिवस आपल्या कुटुंबातील वाढदिवस अथवा पुण्यतिथी या ठिकाणी येऊन साजरी करावी. त्याचबरोबर आपले सर्व क्षेत्रात असलेले चांगले संबंध या विधायक कार्यासाठी उपयुक्त करून या निराधारांना दोन वेळचे पोटभर जेवण मिळेल यासाठी सामाजिक दायित्व म्हणून भविष्यात जबाबदारी घ्यावी असे आवाहन करून पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा मॅडम यांनी आपला स्वतःचा वाढदिवस नववर्षाच्या शुभारंभ दिनी या बेघर निवारा केंद्रात साजरा करून आदर्श निर्माण केला आहे.

पालक व माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात संपन्न

अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

येथील लॉर्ड बसवेश्वरा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये पालक आणि माजी विद्यार्थी मेळाव्याचे नुकतेच दिमाखात आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या प्रदीर्घ शैक्षणिक प्रवासाचा आढावा आणि माजी विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव असा दुहेरी संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला. मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म.बसवेश्वर संस्थेचे सचिव पंडितराव लंगडे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अजय टेंग्से यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णुकांत कराळे उपस्थित होते.

व्यासपीठावर नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, गटशिक्षणाधिकारी लोकदाजी गोडबोले, पोलीस कर्मचारी इंदू गवळी, प्रा. रघुनाथ शेटे आणि मुख्याध्यापिका सौ.शैलजा शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

प्रमुख मार्गदर्शक विष्णुकांत कराळे यांनी पालकांशी संवाद साधताना मोबाईलच्या दुष्परिणामांवर भाष्य केले. "पालक आणि विद्यार्थी दोघांनीही मोबाईलपासून दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. मुलांचे संगोपन करताना त्यांच्या सवयींकडे बारकाईने लक्ष देणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन त्यांनी केले.

प्रास्ताविक करताना डॉ. रघुनाथ शेटे यांनी शाळेच्या १५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ. अजय टेंग्से यांनी शाळेच्या शिस्तीचे व उपक्रमांचे कौतुक केले, तर गटशिक्षणाधिकारी लोकदाजी गोडबोले यांनी शाळेच्या शैक्षणिक दर्जाची प्रशंसा केली.

यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. आपल्या जुन्या शाळेत पुन्हा आल्यामुळे माजी विद्यार्थी भावूक झाले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापिका शैलजा शेटे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कांबळे सर यांनी मानले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

कृष्णाबाई वाघमारे यांचे निधन

नायगाव : (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथील श्रीमती कृष्णाबाई शंकरराव वाघमारे यांच्या वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक १ जानेवारी रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात चार मुले तीन मुली सुना नातू पणतू असा मोठा परिवार आहे. श्रीमती कृष्णाबाई वाघमारे ह्या संपूर्ण हयातभर काबाडकष्ट करून आपल्या चारही मुलांना शिक्षित बनविल्या आहेत त्यांच्या कष्टाला सीमा उरली नव्हती मोल मजुरी करून त्यांनी रक्ताचं पाणी केलं आणि स्वाभिमानाचा जीवन जगलं, पहाटे चार वाजता कुणब्याच्या शेतामध्ये राबायच्या आणि दिवस शेतातच उजडायचा पोटाला पिळ देत कष्ट रात्रीच्या आठ वाजेपर्यंत करायच्या त्या कष्टाचा त्यांनी सोनं केलं.

तहसीलदारांच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपामुळे PMEGP कर्जासाठी सुरू असलेले नऊ दिवसांचे उपोषण अखेर संपुष्टात

मुखेड : (समर्थ गांवकरी)

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) अंतर्गत कर्जाची मागणी करूनही कर्ज मंजूर न झाल्याने नामदेव जाहिरे (रा. जून्ना, ता. मुखेड) यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुखेड शाखेसमोर गेल्या नऊ दिवसांपासून उपोषण सुरू केले होते. या उपोषणामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुखेडचे तहसीलदार राजेश जाधव यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन उपोषणकर्त्याशी थेट संवाद साधला. उपोषणाची पार्श्वभूमी, अर्जदार नामदेव जाहिरे यांची कर्जाबाबतची मागणी तसेच बँकेकडील प्रक्रिया याची सविस्तर माहिती त्यांनी जाणून घेतली. यावेळी संबंधित बँक मॅनेजर यांच्याशीही चर्चा करून प्रकरणासंदर्भात आवश्यक त्या प्रशासकीय सूचना देण्यात आल्या.

तहसीलदारांच्या ठोस व प्रभावी हस्तक्षेपानंतर परिस्थितीत सकारात्मक बदल दिसून आला. प्रशासनाच्या उपस्थितीत चर्चा पूर्ण झाल्यानंतर उपोषणकर्ते नामदेव जाहिरे यांना नारळपाणी पाजून उपोषण सोडवण्यात आले. नऊ दिवस चाललेले उपोषण अखेर शांततेत संपुष्टात आले.

या संपूर्ण प्रक्रियेत तहसीलदार राजेश जाधव यांच्या निर्णयक्षम भूमिकेमुळे आंदोलनाची दिशा बदलली, तसेच बँक व अर्जदार यांच्यात संवादाची प्रक्रिया सुरू झाली. उपोषणामुळे निर्माण झालेला तणाव प्रशासनाच्या तत्पर हस्तक्षेपामुळे नियंत्रणात आला.

यावेळी फुटकळवाडीचे सरपंच प्रतिनिधी डी. बी. चव्हाण, आखरगा माजी सरपंच माधव होणमाने, राठोडवाडीचे पोलिस पाटील प्रकाश चव्हाण, शिवराज कुंडगिर आदी मान्यवर उपस्थित होते.

महिला अत्याचार प्रकरणी किनवट पोलिसांची तत्पर कारवाई

- २४ तासांत दोषारोपपत्र दाखल
- पोलीस अधीक्षकांकडून कौतुक

किनवट : (समर्थ गांवकरी)

अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात किनवट पोलिसांनी जलद व संवेदनशील कारवाई करत अवघ्या २४ तासांच्या आत दोषारोपपत्र दाखल केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक नांदेड मा. श्री. अबिनाश कुमार यांनी किनवट पोलिसांचे कौतुक केले आहे. किनवट पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ०१/२०२६ अंतर्गत BNS कलम ७४, ७९ सह पोक्सो कायदा कलम ८ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक देवानंद फडेवार यांनी केला. तक्रार प्राप्त होताच पोलीस उपनिरीक्षक एस. एस. झाडे यांनी तात्काळ गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान आरोपीस अटक करून साक्षीदारांचे जबाब, घटनास्थळ पंचनामा, ई-साक्ष प्रणालीद्वारे जप्ती व तांत्रिक पुरावे संकलित करण्यात आले. या कारवाईत अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, मा. सुरज गुरव, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली किनवट पोलीस स्टेशनच्या अधिकारी व अंमलदारांनी प्रभावी योगदान दिले.

ऑपरेशन "फ्लश आऊट" व "मिशन निर्भया" अंतर्गत महिला अत्याचार प्रकरणात २४ तासांत दोषारोपपत्र दाखल करून किनवट पोलिसांनी आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे.

"खुर्ची सत्तेची नाही, लोकशाही बळकट करण्याची" - सुनिता खेतमाळीस

श्रीगोंदा नगरपालिकेला नवी दिशा; पदभार स्वीकारताना ठाम राजकीय संदेश

श्रीगोंदा तालुका (समर्थ गांवकरी)

"नगराध्यक्षपद ही सत्तेची खुर्ची नसून लोकशाही अधिक मजबूत करण्याचे साधन आहे," असे ठाम आणि परखड शब्दांत सांगत सुनिता संतोष खेतमाळीस यांनी श्रीगोंदा नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला. सामान्य जनतेच्या विश्वासावरच आपली राजकीय वाटचाल उभी राहील, असा निर्धार व्यक्त करत त्यांनी दुःखापासून सुखापर्यंत कायम पाठिशी उभे राहिलेल्या पाचपुते कुटुंबाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या पदभार सोहळ्याने श्रीगोंदा शहराच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाल्याचे चित्र दिसून आले. या वेळी बोलताना आमदार विक्रम पाचपुते यांनी, "सर्वसामान्य माणसाच्या वेदना जाणणारी, जमिनीवर पाय असलेली नगराध्यक्षा शहराला मिळाली आहे. हा विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी आता सर्वांची आहे," असे ठामपणे सांगितले. विजयी नगरसेवकांनी अहंकार न ठेवता जनतेची सेवा करावी, तर पराभूत उमेदवारांनीही नाराजी बाजूला ठेवून शहराच्या विकासासाठी हातात हात घालून काम करावे, असे स्पष्ट आवाहन आमदार पाचपुते यांनी केले. शहरासह वाडी-वस्तींच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगत शास्ती माफीसाठी राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी आणण्यासाठी ठोस प्रयत्न केले जातील, अधिकारी व कर्मचारी यांनी सकारात्मक सहकार्य करावे, जात–धर्म न पाहता विकास हेच एकमेव धोरण राहील, असा स्पष्ट राजकीय संदेश त्यांनी दिला. नगरसेवकांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय, पालिकेत जनता दरबार सुरू करण्याचा मानस, तसेच नगराध्यक्ष व नगरसेवकांनी सभागृहात अधिक वेळ देऊन लोकांच्या प्रश्नांवर गांभीर्याने चर्चा करावी, यावरही आमदार पाचपुते यांनी भर दिला. "निवडणुकीत कोणी काय भूमिका घेतली, कोणी अडथळे आणले याची मला पूर्ण माहिती आहे; वेळ आल्यावर ते दाखवून देऊ," असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. श्रीगोंदेकर जनतेचे आभार मानत त्यांचा विश्वास कधीही डळमळीत होऊ देणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनीही नगरपालिकेत ठोस, आदर्श आणि लोकाभिमुख काम करून कायमस्वरूपी ओळख निर्माण करण्याचे आवाहन केले. जनतेचे प्रश्न तातडीने सोडवा, सद्गुरू संत शेख महंमद महाराज मंदिराचा प्रलंबित प्रश्न लवकर मार्गी लावा, शहराच्या विकासासाठी मी सदैव तुमच्या पाठीशी आहे, तसेच मुख्यमंत्र्यांकडील कामांसाठी स्वतः पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या सोहळ्यात नगराध्यक्ष सुनिता संतोष खेतमाळीस यांनी आमदार विक्रम पाचपुते यांच्या उपस्थितीत अधिकृत पदभार स्वीकारला. यावेळी सर्व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. एकजुटीचा, विकासाचा आणि लोकहिताचा संदेश देत श्रीगोंदा शहराला नवी दिशा देण्याचा संकल्प या पदभार सोहळ्यातून ठळकपणे व्यक्त झाला.

अहिल्यानगर जिल्ह्यात दोन शिक्षकांसह चौघे अटकेत

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

जिल्हा रूग्णालयातून बनावट दिव्यांग प्रमाणपत्र काढून त्याच्या आधारे शासकीय नोकरी मिळवलेल्या तिघांसह चौघांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गुरूवारी (१ जानेवारी) सायंकाळी अटक केली. यामध्ये दोघांनी शिक्षक म्हणून, तर एकाने तहसील कार्यालयात क्लार्क पदावर नोकरी मिळवली आहे. चौथ्या संशयिताने शासकीय योजनांचा लाभ घेतल्याचा संशय असून त्याच्याकडे चौकशी सुरू आहे.

गदेवाडी (ता. शेवगाव) येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक

असलेला भारत भागीनाथ फुंदे (वय-३४, रा. भुते टाकळी, ता. पाथर्डी), मंगळूरपीर (जि. वाशिम) येथील तहसील कार्यालयात क्लार्क पदावर कार्यरत असलेला नागनाथ जगन्नाथ गर्जे (वय-३४, रा. भगवाननगर, पाथर्डी), पुणे महापालिकेच्या मुंढवा शाळेत शिक्षक असलेला देवीदास प्रकाश बोरूडे (वय- ३५, रा. तनपुरवाडी, ता. पाथर्डी) तसेच खंडेराव ज्ञानोबा फुंदे (वय- ३२, रा. भुते टाकळी, ता. पाथर्डी) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत.

जिल्हा रूग्णालयातील काही कर्मचाऱ्यांना हाताशी धरून कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता तसेच रूग्णालयात नोंद न करता थेट ऑनलाईन पोर्टलवर माहिती भरून बनावट दिव्यांग प्रमाणपत्र काढण्यात आल्याचा प्रकार जिल्हा रूग्णालय प्रशासनाच्या चौकशीतून उघडकीस आला होता. याप्रकरणी जिल्हा रूग्णालय प्रशासनातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पुढे आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक गणेश उगले या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

दरम्यान, या गुन्ह्यातील जिल्हा रूग्णालयातील एका संशयित आरोपी कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. तसेच या प्रकरणातील तिघांनी अटकपूर्व जामीन घेतला आहे. यापूर्वी तिघांना अटक करण्यात आली आहे. गुरूवारी सायंकाळी चौघांना अटक करण्यात आली असून त्यांना काल (शुक्रवार) रोजी न्यायालयासमोर हजर करण्यात येणार होते. बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी मिळवलेल्या तिघांना अटक झाल्याने नोकरदार वर्गात खळबळ उडाली आहे. तसेच अशाच पध्दतीने आणखी काही जणांनी शासकीय नोकऱ्या मिळवल्याचे पोलिसांच्या तपासातून समोर दिसून येत आहे.

ठाणे : भारतीय जनता पार्टीचे पनवेल महानगर पालिकेतील दोनदा नगरसेविका राहिलेल्या प्रभाग क्र १९ मधील अधिकृत उमेदवार सौ. दर्शना भगवान भोईर या यंदा बिनविरोध निवडून आल्याने त्यांच्या प्रभागात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. (फोटो - संतोष पडवळ)

थोडक्यात बातम्या...

महापालिका निवडणूक प्रशासनाचा गोंधळ चव्हाट्यावर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : येथील महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या वतीने सुरू असलेल्या निवडणूक तयारीत मोठ्या प्रमाणावर गोंधळ व अनागोंदी समोर आली आहे. निवडणूक प्रशिक्षणाला प्रत्यक्ष उपस्थित राहूनही काही शिक्षकांना अनुपस्थित राहिल्याच्या कारणावरून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याने शिक्षकांमध्ये तीव्र संताप व संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेच्या या निष्काळजी व विस्कळीत कारभाराचा थेट फटका शिक्षकांना बसत असून, प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विशेष म्हणजे काही शिक्षकांना निवडणूक ड्युटीचे अधिकृत नेमणूक आदेश (ऑर्डर) न देता थेट प्रशिक्षणास अनुपस्थित राहिल्याची नोटीस बजावण्यात आली आहे. नोटीसद्वारेच संबंधित शिक्षकांची निवडणूक कामासाठी नेमणूक केल्याचे कळविण्यात आल्याने हा प्रकार अधिकच धक्कादायक ठरला आहे. अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ साठीचे प्रथम प्रशिक्षण दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी पार पडले. या प्रशिक्षणाला अनेक शिक्षक प्रत्यक्ष उपस्थित असतानाही त्यांना गैरहजेरीची नोटीस पाठविण्यात आल्याचे प्रकार समोर आले आहेत. तर काही शिक्षक सेवेत नसताना, काही वर्षांपूर्वी शाळा सोडून गेलेले असतानाही त्यांच्या नावाने संबंधित शाळांना नोटीस पाठविण्याचा प्रताप महापालिका प्रशासनाने केला आहे.

परदेशी गल्लीतील पन्नास वर्षांपूर्वीच्या रहिवाशांचे झाले स्नेहसंमेलन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर येथील कापड बाजार जवळ असणाऱ्या परदेशी गल्लीत सुमारे पन्नास वर्षांपूर्वी वाड्यामध्ये असंख्य कुटुंबे राहत होती. व्यवसाय निमित्त ती इतरत्र गेली तर काही बंगल्यामध्ये राहिला गेली,या सर्व रहिवाशांचं एकत्रित संमेलन नुकतेच पार पडले. यावेळी नगर मध्ये असणाऱ्या पूर्वीच्या वाडा संस्कृतीला उजाळा मिळाला व प्रत्येकानेच आपले वाड्यातील राहतानाचे अनुभव कथन केले. या संमेलनाची संकल्पना दीपक तलवेजा यांची होती. यावेळी अमृतलाल मुनोत, बोरा, गांधी, मुनोत, देवी, सोहोनी, पवार, संचेती, कोठारी,नहार, तलरेजा,आदी कुटुंबीयांसह सध्या गल्लीत राहणारे कुटुंब उपस्थित होते.संमेलना सहकार्य बन्सीलाल शहा, प्रमोद शहा व त्यांच्या कुटुंबियांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन जयकुमार शिंगवी यांनी केले. कार्यक्रमाचा प्रारंभ गल्लीतील मारुती मंदिरात आरती करून करण्यात आला नंतर हास्य क्लबच्या योगा बद्दल माहिती देण्यात आली.

किनवट शहरात पिसाळलेल्या कुत्र्याचा धुमाकूळ

- ८ ते ९ नागरिकांना चावा – आरोग्य यंत्रणेच्या सज्जतेवर गंभीर प्रश्न

किनवट : (समर्थ गांवकरी)

किनवट शहरात मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून सोमवारी (दि. ३०) पिसाळलेल्या कुत्र्याने शहरातील विविध भागात धुमाकूळ घातल्याची गंभीर घटना घडली. या घटनेत सुमारे ८ ते ९ नागरिकांना कुत्र्याने चावा घेतल्याची माहिती समोर आली असून, शहरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत सौ. सपना संतोष माडपेल्लीवार यांना गंभीर स्वरूपाची जखम झाल्याने त्यांना तात्काळ गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृतीची गंभीरता



लक्षात घेता पुढील उपचारासाठी त्यांना आदिलाबाद येथे रेफर करण्यात आले आहे. पिसाळलेल्या कुत्र्यामुळे जीवघेण्या आजाराचा धोकातज्ज्ञांच्या मते, कुत्र्याच्या चाव्यामुळे होणारा रेबीज (Rabies) हा आजार अत्यंत धोकादायक असून वेळेत योग्य उपचार न मिळाल्यास तो प्राणघातक ठरतो. रेबीजची लक्षणे दिसू लागल्यानंतर रुग्णाचा जीव वाचवणे अशक्य होते. त्यामुळे चावा घेतल्यानंतर त्वरित जखम साबण व पाण्याने धुणे, अँटी-रेबीज लस (ARV), आवश्यक असल्यास रेबीज इम्युनोग्लोब्युलिन (RIG) हे उपचार अत्यावश्यक असतात. किनवट शहरात केवळ कुत्रेच नव्हे तर मोकाट जनावरांचा सुळसुळाट जसे कि, मोकाट गाढवे, डुक्कर, खच्चर यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून हे जनावरं मुख्य रस्त्यांवर बसून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत आहेत. परिणामी अपघातांचा धोका वाढला असून नागरिकांना जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे. विशेषतः शाळकरी मुले, वृद्ध नागरिक व महिला यांना याचा मोठा फटका बसत आहे. आरोग्य व नगरपालिकेच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह या घटनेमुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शहरात अँटी-रेबीज लस पुरेशा प्रमाणात आहे का? , पिसाळलेल्या कुत्र्यांना पकडण्यासाठी स्वतंत्र पथक आहे का?, नगर परिषदेकडून निर्जंतुकीकरण व नसबंदी मोहीम राबवली जाते का?, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपचार देण्याची यंत्रणा सक्षम आहे का?, या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे प्रशासनाकडून अद्याप मिळालेली नाहीत. मोकाट कुत्र्यांची तात्काळ धरपकड पिसाळलेल्या प्राण्यांना वेगळे ठेवण्याची व्यवस्था अँटी-रेबीज लसींचा मुबलक साठा, पशुवैद्यकीय पथकाची कायमस्वरूपी नियुक्ती, शहरात निर्जंतुकीकरण मोहीम राबविणे, जर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. किनवट शहरात सध्या मोकाट जनावरांचा प्रश्न गंभीर बनला असून पिसाळलेल्या कुत्र्यांमुळे नागरिकांचे आरोग्य व जीवित धोक्यात आले आहे.

३ जानेवारीला खंडोराय व म्हाळसादेवी विवाह संपन्न होणार

अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)

नेवासा बुद्रुक हे खंडोबा देवाची सासुरवाडी म्हणून प्रसिद्ध आहे. या गावात खंडोबा - म्हाळसादेवीचे प्राचीन मंदिर आहे, जिथे चंपाषष्ठी व येळकोट-येळकोट उत्सवात लाखो भक्त दर्शनासाठी जमा होतात.उत्सवाच्या वेळी अखंड हरिनाम सप्ताह,कीर्तन-सोहळा आणि तळीभंडारा आयोजित केले जातात.नेवासा बुद्रुक येथील पुरातन खंडोबा-म्हाळसादेवी मंदिरासोबत बानूमाता मंदिरही आहे, ज्यामुळे या ठिकाणाचे धार्मिक महत्त्व द्विगुणित झाले आहे.तीन जानेवारी रोजी खंडोबा म्हाळसादेवी व खंडेराय विवाह सोहळा श्री क्षेत्र नेवासा बु.॥ (खंडोबाची सासरवाडी) ता. नेवासा, जि.अहिल्यानगर येथे दु. १२.३० वाजता संपन्न होणार आहे. या खंडोबा देवाच्या विवाहासाठी सर्व खंडोबा भक्तांनी व ग्रामस्थांनी उपस्थित राहावे.असे आवाहन म्हाळसा खंडोबा बाणाई पुरातन मंदिर जिर्णोध्दार समिती व ग्रामस्थ नेवासा बु.यांनी केले आहे.

कंधार नगराध्यक्ष पदभार शहाजी नळगे यांनी स्वीकारला

शहरातील पालिकेचे प्रशासन पारदर्शी निष्पक्ष आणि लोकांच्या हिताला प्राधान्य देणारे राहील. मूलभूत समस्या सोडविण्यासाठी माझे प्राधान्य असेल,असे लोकनियुक्त नगराध्यक्ष शहाजी नळगे यांनी कबुली दिली.

कंधार : (समर्थ गांवकरी)

कंधार नगर पालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदी बहुमतांनी विजयी झालेले शहाजी नळगे यांनी शुक्रवारी दुपारी माजी नगराध्यक्ष अरविंदराव नळगे, व काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर यांच्यासह. महाविकास आघाडीच्या नेत्याच्या प्रमुख उपस्थितीत कंधार न.पा.सभागृहाच्या शानदार सोहळ्यात नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला.

कंधार शहराच्या विकासासाठी आम्ही कोठेही कमी पडणार नाही. सर्व नगरसेवकांनी कंधार शहरातील नागरिकांच्या आशा आकांक्षा समजावून घेत त्यांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात, असा सल्ला नूतन नगरसेवकांना अरविंद दादा नळगे व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी दिला. या कार्यक्रम सोहळ्यामध्ये मुख्याधिकारी कुलदीप भोळे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्ष शहाजी नळगे यांच्यासह

नूतन नगरसेवकांचा सत्कार सन्मान करून लोकनियुक्त नगराध्यक्ष शहाजी नळगे यांना पदभार हस्तांतरित केला. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शहाजी नळगे यांना त्यांच्या नगराध्यक्षपदाच्या खुर्चीत बसून आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या तर नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शहाजी नळगे यांनी राजकारणातील आपले गुरु तथा वडील अरविंद दादा नळगे यांचा आशीर्वाद घेतला आणि प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात केली.

यावेळी माजी नगराध्यक्ष अरविंदराव नळगे,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर,उबाठाचे नेते. डॉ.पुरुषोत्तमराव धोंडगे, वंचित बहुजन आघाडीचे शिवा नरंगले यांच्यासह महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक,आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. दरम्यान आजच्या बैठकीत न.प.गटनेते म्हणून भास्कर नळगे व दिलीप देशमुख यांची निवड करण्यात आली. नगराध्यक्षांनी पदभार स्विकारताच नगर पालिका परिसरात महाविकास आघाडीच्या वतीने जोरदार फटाक्यांची आतिषबाजी केली.कंधार सर्व पत्रकार बांधवांच्या वतीने सत्कार केला.

डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मोफत आरोग्य निदान शिबीर संपन्न!

पाचशेहून अधिक रुग्णांनी घेतला शिबिराचा लाभ; सामाजिक बांधिलकीचा आदर्श उपक्रम!

अकोले : (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसानिमित्त १ जानेवारी २०२६ रोजी चितळवेढे (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथे भव्य मोफत सर्व रोग निदान आरोग्य शिबीर यशस्वीपणे पार पडले. या शिबिराचा पंचक्रोशीतील पाचशेहून अधिक रुग्णांनी लाभ घेतला.

हे शिबीर हरिश्चंद्र मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन, ट्रायबल डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च सेंटर, मेडिकव्हर हॉस्पिटल (संगमनेर) तसेच समस्त ग्रामस्थ व ग्रामपंचायत चितळवेढे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) अंतर्गत घेण्यात आलेल्या या शिबिरात नागरिकांना रु. ५ लाखांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार, १३५६ उपचार पॅकेजेस तसेच मोफत डायलिसिस सेवेची माहिती व सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

विविध आजारांची तपासणी व निदान : या शिबिरात हृदयरोग, उच्च रक्तदाब, मधुमेह, किडनी विकार, पोटाचे आजार, मेंदू व मज्जासंस्था विकार, फिट, अर्धांगवायू, दमा, कॅन्सर, अस्थिरोग, फ्रॅक्चर, मणक्यावरील आजार तसेच दुर्बिणीद्वारे मुतखडा व प्रोस्टेट शस्त्रक्रिया यासह विविध आजारांवर तपासणी व निदान करण्यात आले.

गंभीर आजार असलेल्या रुग्णांना शासकीय योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात मोफत उपचारासाठी संदर्भ देण्यात आला, तर योजनेत समाविष्ट नसलेल्या आजारांवर सवलतीच्या दरात शस्त्रक्रियेची सुविधा देण्यात आली.

तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन : या शिबिरासाठी विविध क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती लाभली.

डॉ. अमेय इथापे (MBBS, MD, DM – Cardiology)

डॉ. एम. के. भांडकोळी (MBBS, MD Medicine, FCCM)

डॉ. पंकज नंदागवळी (MBBS, MS – General Surgery)

डॉ. अतुल पवार (MBBS, MS, MCh – Urology)

डॉ. सौ. ज्योती भांडकोळी (BHMS – स्त्रीरोग, बालरोग व अक्युपंक्चर तज्ज्ञ)

माऊली आरोटे यांनी आपल्या वतीने संपूर्ण मेडिकल औषधे मोफत उपलब्ध करून देत एक सामाजिक विश्वविक्रम केल्याबद्दल डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

मान्यवरांची उपस्थिती व सत्कार : शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच नामदेव पथवे, उपसरपंच नवनाथ आरोटे, माजी सरपंच विशंभर आरोटे, कामगार पोलीस पाटील किसन कारभारी आरोटे, चितळे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन लक्ष्मण आरोटे, कैलास आरोटे, दादाभाऊ आरोटे, रमेश आरोटे, प्रेमानंद आरोटे, प्रदीप आरोटे, दत्तात्रय आरोटे, बिरबल वाकचौरे, ज्ञानेश्वर आरोटे, अक्षय आरोटे, संचालक यशवंत आरोटे, शांताराम आरोटे, ग्रामसेवक दादासाहेब गुळवे, तलाठी, शिक्षक, ग्रामपंचायत सदस्य शालिनीताई आरोटे, सुजाता आरोटे, मंगल पथवे तसेच आशा सेविका कोल्हाळ ताई आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शिबिरात सहभागी सर्व डॉक्टर व सेतू कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

पंचक्रोशीतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : राजुर, जामगाव, चितळवेढे, विठे, निंब्रळ, निळवंडे, ठाकरवाडी आदी गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला.

यावेळी बोलताना डॉ. एम. के. भांडकोळी यांनी वाढदिवस हा अनाठायी खर्च करण्याचा दिवस नसून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा दिवस असावा, असे मत व्यक्त केले. आपल्या जन्मभूमीचे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने आरोग्य, सेवा व लोककल्याणाचे उपक्रम हाती घ्यावेत, असा संदेश त्यांनी दिला.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनीही आपल्या वाढदिवसानिमित्त सेतू कार्यालयामार्फत शेतकरी फार्मर आयडी, विधवा प्रमाणपत्र, रेशन कार्ड, विविध शासकीय सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याबरोबरच नेत्ररोग तपासणी करून गरजू नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्याचा उपक्रम राबविल्याचे सांगितले.

सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या आरोग्य शिबिराचे सर्वत्र कौतुक होत असून, हा उपक्रम इतरांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)